"मराठी नाटकांना समिक्षक भरपूर लाभले आहेत पण समीक्षा मात्र लाभलेली नाही. एखाद्या नाट्यकृतीचा अभ्यास () म्हणू सखोल, मार्मिक आणि मूल्यमापनात्मक असे काहीही लिहिले गेलेले आढळत नाही. मला प्रश्न पडतो की निर्विवादपणे दखल घेण्यायोग्य ठरलेल्या कलाकृतींची मीमांसा आणि मूल्यमापन होण्यासाठी आमचे समीक्षक लेखकाच्या मरणाचीच वाट पहात राहिले आहेत काय? आपण उद्याच्या मराठी रंगभूमीचे शिल्पकार आहोत याचे तिळमात्रही विस्मरण नाट्यसमीक्षकांनी होऊ देऊ नये एवढीच माझी प्रार्थना आहे." **(वसंत कानेटकर, ५२ वे संमेलन, मुंबई)**

भूमिका त्यांनी १९२३ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात विशद केली आहे, ती मुळाबरहुकूम तशीच उद्‌धृत केली आहे. विश्वविख्यात आधुनिक नाट्यशास्त्रकार स्टॅनिस्लाव्हस्की याचे 'एकॉनॉमी व टाइम'चे सूत्र १८८४ साली आपल्या नाटकातून अंमलात आणणाऱ्या अण्णांना प्रायोगिक नाटककारच म्हणायला हवे.

या नाटकातील अन्य प्रागतिक वैशिष्ट्यांची नोंद घेण्यापूर्वी रामराज्य वियोगाची 'पदे'हाही तितकाच महत्त्वाचा भाग आहे असं मला वाटतं. मी पदांविषयी बोलतोय. त्यातील संगीताविषयी अथवा गाण्यांच्या चालीविषयी मी अनभिज्ञ तर आहेच पण त्यासंदर्भात अधिकारवाणीने काही नमूद करावे एवढा माझा अभ्यासही नाही. पण संगीत नाटकातील पदे किती सुबोध, साधी आणि तरीही अर्थवाही असावी याचं हे नाटक उत्तम उदाहरण आहे. मंथरेचा निर्धार बघा -

**रामासि अनुकूल असती त्यांचे पाडिन दात**
**तरिच खरी मी॥**
**मंत्रीजन कुलगुरू यांचा मोडिन बेत**
**तरीच खरी मी॥**
**कैकयी वळवुनी तिजकारी भूपा व्यसनीं घालिन**
**तरिच खरी मी॥**
**रामा वन भरता सिंहासन देवून जाण**
**जरीच खरी मी॥**

या पदातच त्याची चाल आहे, ठेका आहे, मंथरेच्या स्वभावातील आघात आहे. रामाला अभिषेक होणार आहे या वार्तेने आनंदून नाचणाऱ्या लोकांना रोमारोमांतून रामद्वेष भिनलेली मंथरा म्हणते,

**धेनुमुखी हा व्याघ्रचि किंवा**
**मधुमुख विषघट समजा॥**
**अनुभव येता रडाल**
**मग की आता यातें उमजा॥**
**पोशिल भरतचि तुम्हांला।**
**जरि तो राज्यपदी बसला॥१॥**

आणि या मंथरेच्या भाष्यावर नगररक्षकाचे उत्तर काय-

**सकलांसी रवि प्रिय असतां**
**थूकाने दुःसह होतो॥**
**राकाशशि सुखदचि सर्वां परि**
**चोरा आवडेना तो॥**
**श्रीदत्तनाम ऐकुनियां थरकांप पिशाचा होतो**
**ज्वरितासि ससितपय जैसे॥**
**सतिचरित्र असतिस तैसे॥**
**विषयांचा विचार न दिसे॥**
**पातकिनर पुण्यपथा तो**
**रघुकुलमणि पावन रामा**
**निंदिसि तूं कुत्सितकामा॥ १॥**

ही मंथरा कोणत्या वेळेस काय विघ्न करील हे कळणार देखील नाही, कारण तिचे वर्चस्व फार नाजुक ठिकाणी आहे, असे या नाटकातला विनत म्हणतो तेव्हा त्याला उन्नत उत्तरतो, 'जाऊ दे रे, अशा बटकीच्या पोरीच्या हातून राज्याची उलटापालट होणार आहे?' (साकी)

**कोठे श्रीगुरू वसिष्ठ तैसे कुशल सुमंतही मंत्री**
**उच्छिष्टा खावुनि सोकलि**
**ती कोठे नीचा धात्री**
**व्यर्थचि बडबडती॥**
**आहे काय तिच्या हाती॥ १॥**

शंबूकाला जन्मातून उठवणाऱ्या रामाचा सूड